विशेष दरखास्त क्र. ११ /२०१७

बळीराजा ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था

वि.

बाळु यादव वगैरे

**आदेश निशाणी क्र.३७ वर**

नि.क्र.३६ च्या अर्जावर आदेश देऊन तुरुंग वारंटची बजावणी करण्यासाठी पोलीस मदत देण्यात आलेली आहे. परंतु तो आदेश देताना ऋणको यांचे म्हणणे मागवलेले नाही. त्यामुळे सदर नि.क्र.३६ प्रमाणे दिलेला आदेश स्थगित करण्यात यावा अशी विनंती ऋणको क्र.१ यांचे तर्फे करण्यात आलेली आहे.

२. त्यावर धनको यांनी आक्षेप नोंदवलेला आहे. नमुद अर्ज बेकायदेशीर आहे. ऋणको क्र.१ हे न्यायालयात हजर नाहीत. अर्जा सोबत प्रतिज्ञापत्र दिलेले नाही. ऋणको क्र.१ यांच्या वर्तनाबाबत बेलीफ यांचा अहवाल न्यायालयात दाखल आहे. केवळ प्रकरण प्रलंबित ठेवण्यासाठी व रक्कम वसुल होण्यास विलंब व्हावा याकरीता हा अर्ज दिलेला आहे. त्यामुळे तो नामंजुर करण्यात यावा असे त्यांनी नमुद केले.

३. ऋणको क्र.१ यांचे विरुध्द तुरुंग वारंट नि.क्र.३४ प्रमाणे पाठवण्यात आले. त्यांची बजावणी करण्यासाठी बेलीफ गेले असता ऋणको क्र.१ हे हजर असताना त्यांनी रक्कम देण्याचे नाकारले. बेलीफ यांचे सोबत ते न्यायालयात आले नाहीत. मी कोर्टात येणार नाही तुम्हाला काय करायचे ते करा असे जोर जोराने ओरडुन बोलु लागले व ते तेथुन निघुन गेले. पोलीस मदतीशिवाय त्यांना पकडुन आणता येणार नाही असा स्पष्ट रिपोर्ट बेलीफ यांनी दिलेला आहे.

४. दिनांक २६.०२.२०२० रोजी दुपारी ३.३० ते ४.०० वाजताचे सुमारापर्यंत ऋणको क्र.१ व त्यांचे वकील हे गैरहजर होते. बेलीफ यांनी दिलेला रिपोर्ट स्वयंस्पष्ट असल्यामुळे तसेच ऋणको क्र.१ व त्यांचे वकील गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे न घेता नि.क्र.३६ वर आदेश करण्यात आला आहे. त्यानंतर दुपारी सुमारे ५.०० वाजता हा नमुद अर्ज देण्यात आलेला आहे.

५.		दि.२८.०६.२०१६ रोजी सहकार न्यायालय यांनी दिलेल्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी ही दरखास्त दाखल करण्यात आलेली आहे. आज रोजी पर्यंत  ऋणको क्र.१ यांनी काहीही रक्कम जमा केलेली नाही असे धनको यांचे वकील श्री.व्ही.डी.देशमुख यांनी सांगितले. त्यामुळे केवळ प्रकरण लांबवण्यासाठी हा अर्ज दिलेला आहे ही बाब स्पष्ट होते. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Sd/-

दिनांक : २७/०२/२०२०

( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| a | Name of the Stenographer | : B.R.Kondekar |
| b | Court | : C.J.S.D. Pandharpur. |
| c | Date of Order | : 27.02.2020 |
| d | Order signed by P.O. on | : 27.02.2020 |
| e | Order uploaded on | : 27.02.2020 |